# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** तामलवाडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0007 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**18/01/2025 05:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 17/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 8 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2025
**Time From (वेळेपासून):** 22:09 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 22:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/01/2025 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/01/2025 05:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तामलवाडी ,तुळजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ज्ञानराज आण्णासाहेब गुंड

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2001

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सुरतगाव ,तुळजापूर ,तामलवाडी ,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुरतगाव ,तुळजापूर ,तामलवाडी ,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8983139696

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरज शांतीलाल देवकर | | | 1. श्रध्दा एलीगन्स बाळे,उत्तर सोलापूर ,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 50,000/ हजार रुपये ज्यात पाचशे रुपये दराच्या 100 चलनी | 50,000.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | नोटा असे एकुण | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी ज्ञानराज आण्णासाहेब गुंड, वय 24 वर्ष, व्यवसाय - शेती व गोशाळा रा.सुरतगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव, मोबाईल नंबर 8983139696

मी आज रोजी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा आहे. मी शेती व गोशाळा चालवुन मी माझी उपजिवीका भागवितो. मला गावामध्ये माऊली गुंड या टोपन नावाने ओळखले जाते. मी दिनांक 17.01.2025 रोजी सक्षम हजर राहुन तक्रार दिली की, दिनांक 13.01.2025 रोजी पोलीस ठाणे तामलवाडी येथे गुरनं 06/2025 कलम 110, 115 (2), 126 (2), 189 (2), 190, 191 (2) भारतीय न्याय संहिता 2023 अन्वये माझे मित्र गणेश साळुंके, ओम जगताप, योगेश घोडके, ज्योतीराम मुळे, प्रज्वल राऊत व माझे विरुध्द गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अंमलदार राठोड साहेब हे करीत आहेत.

मला आज दिनांक 17.01.2025 रोजी पोलीस ठाणे तामलवाडी येथील प्रभारी अधिकारी देवकर साहेब यांनी बोलावून गुरनं 06/2025 अन्वये दाखल गुन्हयात तुझे नाव आहे. त्यामुळे त्या गुन्हयात तुला अटक करणे आहे. त्यावेळी मी त्यांना सदर घटनेवेळी मी घटनास्थळी नव्हतो मी बाहेरगावी होतो त्या बाबत तुम्ही खात्री करा असे सांगितले. त्यावेळी सपोनि देवकर साहेब यांनी सांगितले की, तुला अटक न करण्यासाठी व सदर गुन्हयातुन तुझे नाव कमी करण्यासाठी तु मला 1,00,000/- रुपये दे असे म्हणाले. सहा. पोलीस निरीक्षक, देवकर साहेब हे सिंदफळ जवळील लातूर बायपास रोड येथे येणार आहेत मी आज रोजी सिंदफळ जवळील लातूर बायपास रोड येथे जावुन त्यांची भेट घेवुन मला अटक न करणे बाबत व गुन्हयातून नाव कमी करणे बाबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी स्वत: किंवा इतरा मार्फत माझ्याकडे लाचेची मागणी करुन ते स्विकारल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी. वगैरे मजकुराची तक्रारदार दिली.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीवरुन पोनि कदम यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध केले. मी दिलेल्या तक्रारीवरुन आज दि. 17.01.2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. कदम साहेब यांनी सहा. पोलीस निरीक्षक, देवकर साहेब हे माझेकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत तुळजापूर येथे जावुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर कदम साहेब यांचे खाजगी चारचाकी वाहन क्रमांक MH 45 AD 0462 व माझेकडील कारने मी, दोन शासकीय पंच, सापळा पथक असे तुळजापूर येथे रवाना होवुन तुळजापूर - बार्शी जाणारे रोडचे बाजुला सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. त्यानंतर सदर ठिकाणी लाच मागणी पडताळणी करणेसाठी मला व पंच क्र. 1 सरवदे यांना योग्य त्या सुचना देऊन सिंदफळ येथील लातूर बायपास रोड येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर लाचमागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर 18.33 वा.चे सुमारास माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर मी व पंच क्रं.01 असे माझेकडील कार कमांक MH 25 BA 5418 ने सिंदफळ येथील लातूर बायपास रोड येथे गेलो. तेथे गेल्यानंतर देवकर साहेब यांचा मला WhatsApp वरुन व्हॉईस कॉल आला व त्यांनी बायपास येथे थांबलो आहे तेथे ये असे सांगितले. तेथे देवकर साहेब व माझी भेट झाली. आमचेत माझे कामाच्या अनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी सहा. पोलीस निरीक्षक, देवकर साहेब यांनी तपासी अंमलदार राठोड यांना सांगुन मला गुन्हयात अटक न करण्यासाठी व माझे नाव कमी करण्यासाठी पंचासमक्ष माझेकडे 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 50,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व सदर रक्कम घेऊन येण्यास सांगीतले.

त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येऊन पोनि कदम यांना घडलेली



Scanned with OKEN Scanner

हकीकत सांगीतली. त्यानंतर पोनि कदम यांनी व्हाईस रेकार्डरमध्ये झालेले संभाषण ऐकले असता, देवकर साहेब यांनी तपासी अंमलदार राठोड यांना सांगुन मला गुन्हयात अटक न करण्यासाठी व गुन्हयातून नाव कमी करण्यासाठी पंचासमक्ष 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 50,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व सदर रक्कम घेऊन येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले.
त्यावरुन पोनि कदम यांनी सापळा आजमावणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी मला व पंचाना अँथ्रासिन पावडरचा आणि अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग समजावुन सांगुन, त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सापळा पुर्व कारवाई करण्यात आली. ü त्यानंतर मी सापळा कारवाई साठी हजर केलेल्या नोटांना पोलीस अंमलदार डोके यांनी अँथ्रासिन पावडर लावुन, सदरच्या नोटा माझ्या पँटच्या उजव्या खिशात ठेवल्या. त्यादरम्यान मला देवकर साहेब यांचा WhatsApp वरुन व्हॉईस कॉल आला. त्यावेळी त्यांनी मला कधी येणार आहे असे विचारले असता मी त्यांना पंधरा मिनीटात येतो असे सांगितले. त्यावर त्यांनी त्यांचे तामलवाडी येथील शासकीय निवासस्थानी येण्यास मला सांगितले. पोनि कदम साहेब यांनी मला देवकर साहेब यांनी स्वत: किंवा इतरामार्फत लाच रक्कम स्विकारल्यानंतरचा करावयाचा इशारा नेमुन दिला. त्यांनतर मी, कदम साहेब, शासकीय पंच व सापळा पथक असे तुळजापूर - बार्शी रोडवरुन तुळजापूर - सोलापूर रोडवरील सुरतगाव जवळ सुरक्षीत ठिकाणी जावुन थांबलो. त्यानंतर तेथे पो.अं. पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना देवकर साहेब यांची भेट घेण्यासाठी शासकीय निवासस्थान, तामलवाडी येथे माझेकडील कारने 21.43 वा.सु. रवाना केले व आमचे पाठोपाठ सापळा पथक हे कदम साहेब यांचे चारचाकी वाहनाने आले. मी व पंच क्रमांक 1 असे कारने शासकीय निवासस्थान तामलवाडी येथे गेलो. तेथे गेट जवळ देवकर साहेब थांबले होते. त्यानंतर आम्ही खाली उतरुन शासकीय निवास्थानमध्ये गेलो. तेथे कामाच्या अनुषंगाने आमच्यात चर्चा झाली. त्यानंतर देवकर साहेब यांनी आणलेत का असे म्हणुन हाताने इशारा केला. त्यावेळी मी माझे पँटच्या उजव्या बाजुच्या समोरील खिश्यातील अँथ्रासिन पावडरयुक्त 50,000/- रु लाच रक्कम उजव्या हाताने काढुन देवकर साहेब यांचेसमोर धरली असता, ती रक्कम देवकर साहेब यांनी डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील पँटच्या डाव्या बाजुच्या समोरील खिश्यात ठेवली. त्यानंतर मी मला लाच रक्कम स्विकारल्या नंतरचा नेमुन दिलेला जर्किंगची टोपी डोक्यावर घालुन 22.09 वाजताचे सुमारास लाच स्विकृतीचा इशारा केला. इशारा प्राप्त होताच पो.नि.कदम साहेब, पंच क्र.2 व सापळा पथक हे तात्काळ घटनास्थळी हजर आले. त्यावेळी पोअं/ पाटील यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. तेव्हा पो.नि.कदम साहेब यांनी पंच क्र.1 यांना विचारणा केली की, तक्रारदार यांना कोणी लाचेची मागणी करुन, ती लाच रक्कम कोणी स्विकारली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगितले की, देवकर साहेब यांचेकडे हाताने इशारा करुन, त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वत: स्विकारली आहे. त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी देवकर साहेब यांना ताब्यात घेवुन स्वत:चा परिचय देवुन त्यांचा नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव सुरज शांतीलाल देवकर, वय 35 वर्ष, व्यवसाय नोकरी पद- सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे तामलवाडी ( प्रभारी अधिकारी ), सध्या रा. श्रध्दा एलीगन्स, बाळे, अभिजीत कापसे यांचे घरी किरायाणे, ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर मुळ रा. रेडा, ता. इंदापूर जि. पुणे असे सांगितले. त्यानंतर तेथे पोनि कदम व सापळा पथकाने पंचासमक्ष यशस्वी सापळा कारवाई नंतरची पुढील कायदेशीर कारवाई केली.
तरी सुरज शांतीलाल देवकर, वय 35 वर्ष, व्यवसाय नोकरी पद- सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे तामलवाडी ( प्रभारी अधिकारी ) यांनी पोलीस ठाणे तामलवाडी येथे गुरनं 06/2025 कलम 110, 115 (2), 126 (2), 189 (2), 190, 191 (2) भारतीय न्याय संहिता 2023 अन्वये माझे विरुध्द दाखल गुन्हयात तपासी अंमलदार राठोड यांना सांगुन मला अटक न करण्यासाठी व सदर गुन्हयातून माझे नाव कमी करण्यासाठी माझेकडे पंचासमक्ष दिनांक 17.01.2025 रोजी 1,00,000/-रु. लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 50,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व अँथ्रासिन पावडरयुक्त लाच रक्कम 50,000/- रुपये सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन माझी सुरज शांतीलाल देवकर, वय 35 वर्ष, व्यवसाय नोकरी पद- सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे तामलवाडी ( प्रभारी अधिकारी ), सध्या रा. श्रध्दा एलीगन्स, बाळे ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर मुळ रा. रेडा, ता. इंदापूर जि. पुणे यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करुन, त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली, ती मी वाचुन पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.



13. Action taken: Since ... offence(s) u/s as ... केलेल्या कलमान्वये ...
(1) Registere... (प्रकरण ...
(2

Scanned with OKEN Scanner

R.B (एन.सी.आर.
अन्वेषण फॉर्म -



13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SANJAY BABURAO RATHOD
**Rank** (पद): PC (Police Constable) **No.**(क्र.): 199
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
18/1/25

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी यांची स्वाक्षरी)
**Name**(नाव): SURAJ SHANTILAL D
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): API



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner